श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें.] वैशाख शके १८४८ [अंक २ रा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड-बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ४७३-४९६ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ६७९-६९४ |


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यां-मधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास मोठी मदत केल्यासारखें व श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पड-तील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.


**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रें, बी. बी. सी. आय्. रेल्वे.


## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु.३।=व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

कविवर्य संतमहिपती बावा यांच्या धर्तीवर लिहिलेल्या ह. भ. परायण दासगणू महाराज यांच्या संतलीलामृत व भक्तलीलामृताच्या प्रती मिळण्याचें ठिकाण:—


**गो. र. दाभोळकर.**

५ सेंट मार्टिन्स रोड वांद्रें, बी. बी. सी. आय्. रेल्वे.



कै० वा० **नारायण गोविंद** ऊर्फ **नानासाहेब चांदोरकर**, बी. ए.

श्रीसाइदत्त गुरुवेनमः

सप्रेम सा. न वि. वि. आपल्या विबुध-मान्य श्रीसाइलीलेच्या एखादे अंकीं खालील मजकुरास स्थल मिळावें अशी सविनय प्रार्थना आहे.

## उपजातिवृत्त.

अनंत, मत्स्यं कमठं वराहं ॥
नरं नृसिंहं नृपतिं प्रणम्य ॥
न्याय्या-भया यद्वरदाश्च बाहा[१] ॥
चिंतामणि[२] त्वां शिव साइदेव ॥ १ ॥

तमोपहं वामन रामराम[३] ॥
धंतार[४] मीष्टवा जगतःप्रच क्षे ॥
तोषाय लोकस्य च सानुराग[५] ॥
मांगल्यलीलास्तव जीवं[६]वा-घो ॥ २ ॥

येन त्वया कृष्ण वरं[७] पतीनां ॥
जयाय गीता विजयं[८] समुक्ता ॥
नाः[९]किं भवान्बुद्ध हरिश्चवायु[१०] ॥
पति र्बभूवोग्रशतै स्त पोभि ॥ ३ ॥

---

१ बाहु=हात. २ श्रीगजानन किंवा चिंतित फल देणारें रत्न ३ परशुराम ४ जगदाधिप ५ सूर्या प्रमाणें तेज आहे ज्याचें ६ प्राण वायु ७ भक्तांमध्यें ८ अर्जुन ९. न+अः न = नाहीं अः, स्मृतिदर्शक उद्गारवाची अव्यय = नव्हे का ? १० योगेश्वर.

युग्मं भवित्कल्कि पदस्य प्रीत्या ॥
पायाच्च मे दत्तगुरोऽग'कानि ॥
सदा मुखे नाम तवास्ति ये षां ॥
ते यांतु पुण्यं पदमव्ययं ते ॥ ४ ॥

अर्थ:-- हे साइदेवा, तूं चिंतित फल देणारें रत्न व विघ्नविनायक गणेश आहेस. तसेंच मंगलकारक शंकरावतार आहेस. हे अनंत, मत्स्य, कच्छ, वराह व श्रेष्ठ भूपती नरसिंह हेही अवतार धारण करणारा तूंच आहेस. तुझे दोन्ही हात न्याय्य कर्मे करणारे असून त्यांपैकीं एक अभय देणारा असून दुसरा वर देणारा आहे. वामन, परशराम व राम हेही अवतार तूंच धारण केलेले असून अज्ञानाचें नाशन करणारा व अखिल ब्रह्मांडाचा शास्ताही तूंच आहेस. असा जो तूं त्या तुझें प्रथम स्तवन व वंदन करून हे सूर्यनारायणा, लोकांना आनंद व्हावा म्हणून मी तुझ्या मंगलकारक लीलांचें वर्णन करतों. सर्वांच्या अंतर्यामी वास करणाऱ्या हे प्राणवायो, ज्या तूं कृष्णावतार धारण करून भक्तांमध्यें श्रेष्ठ असा जो अर्जुन त्यास जय प्राप्त व्हावा म्हणून उत्कृष्ट-प्रकारें भगवद्गीता सांगितलीस. हे साइराजा, शेंकडों प्रकारच्या भयंकर तपांचें आचरण करून योगेश्वर बनून, बुद्धावतार घेणारे भगवान् विष्णू आपणच नव्हेत का ? हे दत्तगुरो ! कल्कि अवतार धारण करणारेही आपणच आहांत. त्या आपल्या चरणाची जोडी प्रेमानें माझ्या सावयव शरीराचें संरक्षण करो. व त्याच प्रमाणें ज्यांच्या मुखांत तुझें नाम निरंतर असेल, ते लोक तुझ्या पुण्य व अविनाशि पदाला जावोत.

## अनुष्टुप्.

सद्गुरुं ज्ञानजलधिं भक्तमंदारमव्ययम् ।
दासदैन्यहरं साइं कंदमानंद सौख्य योः ॥ १ ॥

१ शरीरावयव=शरीर.

आदौ प्रणम्य तं देवं पश्चात्सद्भक्तपुंगवं ।
"नानासाहेब" नामानं चांदोरकरसंज्ञितं ॥ २ ॥

कैलासवासिनं पुण्यं बुद्धिज्ञानसमन्वितं ।
उभौ तौ च मुहुर्वंदे ऽ परौ कृष्णधनंजयौ ॥ ३ ॥

"नाना"र्थं शोभना लीला याः साइगुरुणा कृताः ।
यथाकालं यथा देशं, शतशोऽथ सहस्रशः ॥ ४ ॥

तासां कतिपया ज्ञाताबोध कौतुकसंयुताः ।
आख्यातुं चाल्पबुध्याताः प्रारभे भक्तशर्मणे ॥ ५ ॥

अर्थः—अविनाशी, भक्तांचे कल्पवृक्ष, ज्ञानसागर, दासांचें दारिद्र नाहींसे करणारे, आनंद व सौख्य यांचा गड्डा अशा त्या साइदेवास प्रथम वंदन करून नंतर सद्भक्तांत श्रेष्ठ, पुण्यवान, बुद्धिवान, ज्ञानसंपन्न कैलासवासी नानासाहेब चांदोरकर यांस नमन करून केवळ दुसरी कृष्णार्जुनाची जोडी अशा त्या उभयतांस पुन्हा नमस्कार करतों. आणि ज्या ज्या समयीं व ज्या ज्या ठिकाणीं श्रीसद्गुरु साइनाथ बाबांनीं नानासाहेबांसंबंधानें ज्या ज्या शेकडों-हजारों शुभदायक लीला केल्या त्यांपैकीं मला माहीत असलेल्या कांहीं ज्या बोध व कौतुक यांनीं भरलेल्या आहेत त्या भक्तांच्या अंतःकरणास आनंद व्हावा म्हणून अल्पबुद्धीनें सांगण्यास सुरवात करतों.

## नानासाहेबांस बाबांचें प्रथमदर्शन.

ही हकीकत लिहिण्यापूर्वी कित्येक बाबतींत किंचित् गैरसमज होण्याचा संभव आहे किंवा व्याजस्तुति केल्याचा मजवर आरोपही येण्याचा संभव आहे. करितां प्रथम तो दूर करण्याकरितां दोन शब्द लिहितों. माझ्या पूर्वीच्या एका लेखावरून वाचकांच्या स्मरणांत असेलच कीं माझी व नाना-साहेबांची प्रथमभेट कशी झाली, माझ्या स्वप्नांत मला दोन मूर्ति दिसल्या व त्या श्री बाबा व नानासाहेब ह्या होत्या, मी पुढें शिरडीस गेल्यावर जेव्हां

बाबांस निरखून पाहिलें तेव्हां स्वप्नांतील जोडीपैकीं एक ते हेच श्री व दुसरे नानासाहेब अशी खात्री पटली, व जसा माझे चासकमान येथील अजोळकडील योगी पितामह बंधुद्वय होते व त्यांस आम्हीं "थोरले बाबा व धाकटे बाबा" असें म्हणत असूं त्यांची मला आठवण होऊन मी नानासाहेबांस धाकटेबाबा म्हणूनच मानीत असें व मानतों. नानासाहेबांचा व माझा क्वचितप्रसंगीं पारमार्थिक व प्रापंचिक बाबतींत मतभेदही होत असे, नाहीं असें नाहीं. तथापि त्यांच्यावरील माझें प्रेम व मजवरील त्यांचें प्रेम केव्हांही कमी झालेलें नव्हतें, व त्यांच्यावरील माझें प्रेम व पूज्यबुद्धि अद्या-पही कायमच आहे व पुढेंही आमरण कायमच राहो अशी मी श्रीचरणीं प्रार्थना करतों. वरील श्लोकपंचका पैकीं तिसरे श्लोकांत मी त्यांच्या व श्रींच्या संबंधानें जी उपमा वापरली आहे ती अगदीं तंतोतंत नसली तरी कित्येक बाबतींत किती अन्वर्थक आहे हें त्यांच्या संबंधानें आतां लिहिल्या जाणाऱ्या कित्येक लीलांवरून अनुभवास येईल. अलोट गुरुभक्तीनें प्रेरितभक्त जेव्हां प्रापंचिक व्यवहार करतात तेव्हां त्यांच्या सर्वच पारमार्थिक गुणांस जगापुढें येण्यास वाव मिळतो असें नाहीं. कित्येक वेळां तर "अहो हे इतके सद्भक्त व परमार्थप्रिय असून व्यवहारांत यांचें समतेचें धोरण कां नाहीं, यांचे ठिकाणीं विकारवशता कां दिसावी" वगैरे त्यांच्या संबंधानें सवालही विचारण्यांत येतात. परंतु सद्भक्त म्हणजे साधकच....ते साधू नव्हेत. साधकास कर्माप्रमाणें देह प्राप्त होतो व कर्माप्रमाणेंच त्याचा स्वभावही बनलेला असतो. सद्भक्तांचे ठिकाणीं व्यावहारिक बाबतींत जरी वर्तनविषमता अथवा स्वभाव-वैचित्र्य नजरेस पडलें तरी त्यांच्या अप्रतिम गुरुप्रेमभक्तीबद्दल, पारमार्थिक ज्ञानोत्सुकतेबद्दल व इतर सद्गुण समुच्चयाबद्दल त्यांच्यावरील आपलें प्रेम व आपली भक्ति यत्किंचितही कमी होऊं देणें केव्हांही योग्य होईल असें मला वाटत नाहीं; व त्यांच्या गुरुप्रेमास्पदतेबद्दल लिहितांना त्यांच्या संबंधानें जे कांहीं मधुर व प्रेमोद्गार काढावे लागतील ते व्याजस्तुत्यात्मक होतील असेंही मला वाटत नाहीं. असो. नानासाहेब विद्वान होते. ते ज्ञानी होते, थोर होते, सद्भक्त, होते व त्यांचें बाबांवर व बाबांचें त्यांच्यावर अलौकिक प्रेम होतें,

नानासाहेबांचा व माझा पुष्कळ वेळ निकट संबंध होता. कित्येक वेळां मी व त्यांनीं रात्रीच्या रात्री जागून काढिल्या आहेत. त्या रात्रींत फक्त बाबांचेंच लीलावर्णन चाललेलें असे व तें वर्णन करतांना त्यांच्या नेत्रांतून नेहमी आनंदाश्रु गळत असत. अहो, बाबांनीं कितीतरी अगणित लीला केल्या आहेत व रोज करीत आहेत. त्या मी जर तुम्हांस सर्व सांगत बसेन तर येवढें घरही पुरणार नाहीं असें ते म्हणत. त्यांचें अंतःकरण उचंबळून येई व कित्येक वेळां ते सांगतां सांगतां स्तब्ध बसत. व गुरुमायेच्या अद्वितीय भक्तवत्सलतेबद्दल धन्यवाद गात. नानासाहेबांची योग्यता फार मोठी होती. ते बाबांचे पहिले सद्भक्त होते. ते बाबांच्या गळ्यांतील ताईत होते. त्यांना बाबांचा कधीं कधीं साक्षात्कार होत असे. बाबांनीं त्यांना सांगितलेल्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी गुप्त ठेवण्याबद्दल व कांहीं लोकांस सांगण्याबद्दल बाबांची त्यांस आज्ञा असे, असें ते मला सांगत. बाबांच्या समागमांत नानासाहेबांनीं कमीत कमी २० वर्षें काढिलीं असावीं.

नानासाहेब नगर जिल्ह्यांत कलेक्टरचे चिटणीस असतां कोपरगांव तालुक्याच्या जमाबंदीकरितां कलेक्टर साहेबांची स्वारी एक वेळीं कोपरगांव मुक्कामीं आली. श्रीयुत आप्पा कुलकर्णी हे त्यावेळीं शिरडीचे कुलकर्णी होते. शिरडी हे कोपरगांव तालुक्या पैकीं एक गांव आहे. कोठेंही जावयाचें असल्यास बाबांस वंदन करून व त्यांना विचारून जावयाचें असा त्यांचा नियम असे. त्या प्रमाणें एके दिवशीं जमाबंदी करतां ते कोपरगांवास जातेवेळीं बाबांस वंदन करण्यास मशिदींत गेले व बाबांचे जवळ बसले. बाबा म्हणाले, "आप्पा तूं कुठें जातोस." आपा म्हणाले मी कोपरगांवीं जमाबंदी करतां जातों. बाबा म्हणाले, मग माझें एक काम करशील का ! आप्पा म्हणाले होय करीन. बाबा म्हणाले, कलेक्टर साहेबांचा चिटणीस नाना आहे त्याला म्हणावें तुला बाबांनीं बोलाविलें आहे. आप्पा म्हणाले, नानासाहेब हे चिटणीस आहेत. त्यांस मी हा निरोप सांगून ते कसे येतील. बाबा म्हणाले, तूं त्याला माझा निरोप तर सांग. आप्पा म्हणाले बरें. नंतर बाबांची आज्ञा घेऊन आप्पा कोपरगांवास गेले व त्यांनीं तो निरोप नानासाहेबांस सांगितला. नानासाहेब म्हणाले, आप्पा ह्या

असल्या थापा कशाला मारतोस. कोणीकडून तरी तुझी जमाबंदी लवकर होऊन तुझी येथून लवकर सुटका व्हावी म्हणून तूं ही क्लृप्ति काढली आहेस. नाहींतर बाबांची व माझी ओळख काय? मी कधीं जन्मांत त्यांचेकडे गेलों नाहीं व त्यांना कधीं काळे का गोरे पाहिलें नाहीं.असें असतां ते मला कशाला बोलावतील. जमाबंदींतून लवकर निसटण्याची ही तुझीच स्वतःची युक्ती आहे. व तसेंच असेल तर तसेंच सांग, मी तुला लवकर मोकळा करीन. परंतु अशा विनाकारण थापा कां देतोस? आप्पा म्हणाले, नानासाहेब आपण कोण हें मी जाणत नाहीं का व आपल्यास मी थापा देईन का? मला अशा थापा देण्यांत फायदा काय? मला लवकर जावयाचें असेल तर मी आपणास तसेंच सांगेन; पण अशा थापा देणार नाहीं. बाबांनीं जो निरोप सांगितला तो मीं आपल्यास सांगितला. आपण जसें सांगाल तसें मी बाबांना सांगेन. नानासाहेब म्हणाले, माझा व बाबांचा संबंध नाहीं. ते मला बोलावणार नाहींत व इतकेंही असून तुझ्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं मला बोलावलें असेल तर मी येत नाहीं म्हणून त्यांना सांग. आप्पा म्हणाले, बरें आप्पांचें कामकाज आटोपल्यावर आप्पा परत शिरडीस आले व घडलेलें सर्व वृत्त त्यांनीं बाबांस निवेदन केलें. बाबा म्हणाले, बरें पुन्हा जेव्हां जाशील तेव्हां नानाला हाच निरोप सांग कीं, बाबांनीं तुला एकदां बोलाविलें आहे. आप्पा म्हणाले बरें. नंतर कांहीं दिवसांनीं आप्पा पुन्हा नानासाहेबाकडे कांहीं सरकारी कामा करतां गेले. व त्यांनीं बाबांचा तोच निरोप नानासाहेबांस पुन्हा सांगितला. नानासाहेबांनींही पूर्वींचेंच उत्तर पुन्हा दिलें. आप्पा परत गेले व बाबांना नानासाहेबांचें उत्तर कळविलें. नंतर बाबा म्हणाले कीं,पुन्हा तोच निरोप आणखीं एकदां नानास सांग. आप्पानीं पुन्हा त्याप्रमाणें केलें.नानासाहेब म्हणाले बरें येईन एखादेवेळीं. नंतर कांहीं दिवसांनीं नानासाहेबांचे मनांत आलें कीं, उद्यां आपण बाबांकडे जावें. म्हणून त्यांनीं आपल्या कुटुंबास ( अर्थात या वेळीं ते नगर येथें असले पाहिजेत) सांगितलें कीं माझा काळा अल्पाकचा अंगरखा बाहेर काढून ठेव. आई साहेब ( नानासाहेबांचे कुटुंबास मी आईसाहेब म्हणतों) म्हणाल्या, तो अंगरखा तर आपण कधीं घालीत नाहीं.तो नादुरुस्त

असल्यामुळें आपण तो आज दोन वर्षे गाठोड्यांत बांधून ठेवला आहे. नानासाहेब म्हणाले, मला तोच अंगरखा पाहिजे आहे. आईसाहेब म्हणाल्या ठीक आहे. त्यांनीं त्याप्रमाणें तो अंगरखा काढून ठेविला. नानासाहेबांनीं दुसरे दिवशीं तोच अंगरखा घातला व ते शिरडीस जाण्याकरितां निघाले. वाटेनें जातां जातां त्यांचे मनांत नानाप्रकारचे विचार येऊं लागले. मी एखादे फकिरास भेटावयास जातों आहें, अगर एखादे साधूचे दर्शनास जात आहें. जर खरोखरच साधुदर्शनास जात असेन तर रिक्तहस्तानें साधुदर्शनास जाऊं नये असें शास्त्र आहे व मजजवळ तर कांहीं नाहीं व शिरडी हें अगदींच खेडेगांव असल्यामुळें तेथें तर कांहींच मिळणार नाहीं. तरी आतां मी कुठें व कशाकरितां जात आहें याचा निर्णय कसा व्हावा. असो, निघालों तर खरा. आतां जसें व्हावयाचें असेल तसें होईल. असें म्हणून ते शिरडी जवळ आले. इतक्यांत त्यांचा हात सहज त्यांच्या अल्पाकच्या अंगरख्याच्या खिशांत गेला. त्यांत त्यांना एक लहानशी पुडी मिळाली. ती उघडून पाहतां तिच्यांत २-४ फोडलेले बदाम व २-४ खडीसाखरेचे खडे मिळाले. नानासाहेबांस सकौतुक आश्चर्य वाटलें व कांहीं कां असेना मी बाबांकडे रिक्तहस्तानें जात नाहीं व मी साधूकडेच जात आहे फकिराकडे जात नाहीं असेंच त्यांना वाटूं लागलें. नानासाहेब मशिदींत गेले. मशीद पडकी व जुनी होती. बाबा एका पटकुरावर बसले होते. नानासाहेबांनीं बाबांस त्यांचे चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार घातला व पुडींतील बदाम व खडीसाखर बाबांस अर्पण केली. व बाबांनीं तेच बदाम व तीच खडीसाखर नानासाहेबांस परत दिली व तूं खा म्हणून सांगितलें. नानासाहेब म्हणाले, आपण यापैकीं थोडेंसें खा म्हणजे मी खातों. बाबांनीं त्यांतील थोडासा बदामाचा तुकडा व थोडासा खडीसाखरेचा तुकडा खाल्ला. नंतर प्रसाद म्हणून नानासाहेबांनीं बाकीचे बदाम व खडीसाखर खाल्ली. नंतर नानासाहेबांनीं विचारलें, " बाबा मला कां बोलाविलें " बाबा म्हणाले " नाना जगांत काय थोडीं माणसें आहेत त्यांना न बोलावतां मीं तुलाच कां बोलावतों याचें कांहीं तरी कारण असेलच कीं नाहीं " नानासाहेब म्हणाले, " मला तें कारण माहीत नाहीं. आपणच सांगा. " बाबा म्हणाले " अरे तुझा व माझा चार

जन्मांचा संबंध आहे. तुला तो माहीत नाहीं, परंतु मला तो माहीत आहे आणि म्हणूनच मी तुला बोलावतों. वेळ सांपडेल तेव्हां एखादे वेळीं येत जा." नानासाहेब म्हणाले बरें आहे. येत जाईन. असें म्हणून नानासाहेबांनीं बाबांस पुन्हां साष्टांग नमस्कार करून बाबांची रजा घेतली. नानासाहेब चालूं लागले त्यावेळीं मला श्रीमद्भगवद्गीतेंतील चवथे अध्यायांतील पांचवे श्लोकाची आठवण झाली.

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तवचार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ।

भारतीय युद्धाचे वेळीं धनुर्धर व भक्तश्रेष्ठ अर्जुनास पडलेला मोह त्याच्या क्षात्रकर्तव्यबुद्धीच्या आड येऊन त्याच्या अजरामर व अद्वितीय कीर्तीस कलंक लावूं पाहात आहे व कर्तव्य व नीति यांतील भेद काय व अशावेळीं प्राधान्य कोणास द्यावयाचें या त्याच्या चतुर बुद्धीस हिरावूं पाहात आहे असें भगवंतांचे लक्षांत आल्यावर त्यास रणांगणावरच भगवंतानीं गीता सांगण्यास सुरवात करून, योगा ( ज्ञानयोग व कर्मयोग ) ची महती सांगतांना हा योग प्रथम कोणास सांगितला व नंतर कांहीं काल हा योग नष्ट कसा झाला व आतां तोच योग तुला कां सांगतों याबद्दलची हकीकत चवथे अध्यायाचे पहिले तीन श्लोकांत सांगितली. अर्जुनास शंका आली कीं, श्रीकृष्णाचें व आपलें वय सारखेंच असतां श्रीकृष्णानें हा योग प्रथमतः सूर्यास सांगितला हें कसें. सूर्याचा जन्म तर उभयतांच्या परम महापरम परात्परपरम पूर्वजांनाही माहीत नाहीं. असें असून श्रीकृष्ण सूर्यास हा योग कसा सांगूं शकेल. ही शंका घेऊन अर्जुनानें श्रीकृष्णपरमात्म्यास चवथे श्लोकांत याबद्दल प्रश्न विचारला. त्याचें उत्तर भगवंतांनीं पांचवे श्लोकांत दिलें आहे. तेंच येथें हुबेहुब लागूं पडतें असें मला वाटलें. वरील पांचवे श्लोकांतही असेंच सांगितलें आहे कीं, अर्जुना माझेही आजपर्यंत अनंत जन्म झाले आहेत व तुझेही अगणित जन्म झाले आहेत. त्या सर्वांना मी जाणतों. तूं मात्र जाणत नाहींस. इतकें झालें तरी बाबांच्या बोलण्यावर व त्यांचे साधुत्वावर नानासाहेबांचा तावडतोब विश्वास

बसेना. बाबा म्हणतात ही गोष्ट खरी असेल काय,बाबा खरोखरच साधू असतील काय वगैरे नानाप्रकारच्या विचारांनीं त्यांचें मनांत काहूर करून सोडिलें. खरोखर आपला व बाबांचा कांहीं संबंध नसेल तर त्यांनीं मलाच मुद्दाम कां बोलवावें व वर प्रमाणें कां सांगावें. दोन वर्षें नादुरस्त म्हणून टाकून दिलेला अंगरखा त्याच दिवशीं घालण्याची इच्छा कां व्हावी. त्या अंगरख्याचे खिशांत आपणच केव्हांतरी बदाम व खडीसाखरेची पुडी ठेवली असेल. पण त्या पुडीचा उपयोग दोन वर्षांनंतर याचवेळीं व बाबांच्याकडेच कां व्हावा ! बाबा मुसलमान फकीर आहेत. आपल्या वडिलांचे गुरु तर भिवंडी तालुक्यांतील कवाड गांवीं वास्तव्य करीत असलेले सत्पुरुष श्रीसखाराम महाराज हे आहेत. सखाराम-महाराज ब्राह्मण आहेत तरी माझा व मुसलमानांचा संबंध कसा असूं शकेल वगैरे वगैरे संकल्प विकल्पांनीं त्यांस भंडावून सोडिलें. या प्रमाणें विचार करीत करीत ते नगरास परत गेले. त्यावेळीं बाबा अगदीं नेहमीच्या साध्या माणसा-सारखे यथास्थित साधे व स्पष्ट बोलत असत.

इतकें झालें तरी नानासाहेबांचा विश्वास बाबांवर बसेना. पुढें थोडेच दिवसांनीं अशी एक मजा झाली कीं जिकडे तिकडे प्लेगाचा प्रादुर्भाव अतिशय झाल्यामुळें कलेक्टर साहेबांच्या आफिसांतील सर्व मंडळींनीं प्लेगची लस टोंचून घ्यावी असें, त्यावेळीं असलेल्या कलेक्टर साहेबांनीं नानासाहेबांस सांगितलें, व प्रथम तुम्ही टोंचून घ्या म्हणजे इतर मंडळी टोंचून घेतील असेंही नानासाहे-बांस त्यांनीं सुचविलें. नानासाहेबांस फार पंचाईत पडली, परम संकट वाटलें. प्लेगचे लसीचा उपाय नवीनच होता. प्रयोग अगदीं बाल्यावस्थेंत होता. लस टोंचून घेण्याकडे कोणाची प्रवृती नसे. लसीचे परिणाम फारसे अनुकूल होत नसत. अशावेळीं आतां काय करावें हें त्यांस सुचेना. त्यांनीं ही गोष्ट आफिसांतील सर्व मंडळीस सांगितली. परंतु ती कोणासच रुचेना. कले-क्टर साहेबांचा लकडा तर नानासाहेबांचे मागें बहुतेक दररोज लागला. कचेरींतील मंडळी तर या गोष्टीस बिलकूल अनुकूल नाहींत. कलेक्टर साहे-

बांचा तर बराच आग्रह दिसला व तूं टोंचून घेतलेंस म्हणजे कचेरींतील मंडळी व गांवांतीलही पुष्कळ लोक टोंचून घेतील व एकंदरींत या उपायाचा फैलाव सर्व लोकांत जास्त होईल. लोकांचे लसी संबंधानें गैरसमज दूर होतील व पुष्कळ लोक या प्लेगचे संकटापासून मुक्त होतील व त्यांस कायमचा फायदा होईल असें त्यांचें म्हणणें पडलें. याबद्दलची सल्ला कोणास विचारावी, कोठें जावें असें नानासाहेबांस मोठें कोडें पडलें. इतक्यांत त्यांना युक्ति सुचली कीं ही गोष्ट बाबांस विचारून पाहावी व बाबा काय म्हणतात तें ऐकून घ्यावें. या प्रमाणें निश्चय करून नानासाहेबांनीं कलेक्टर साहेबांस सांगितलें कीं लसीचा उपाय पूर्णावस्थेस पोंचलेला नाहीं, तो बाल्यावस्थेंत आहे. करितां लस टोंचून घ्यावी किंवा नाहीं याबद्दल अझून माझें मत निश्चित झालें नाहीं. तरी कृपा करून आपण मला या गोष्टीचा विचार करण्यासाठीं आठ दिवसांची मुदत द्यावी. तितक्या मुदतींत मी आपला निश्चय आपल्यास कळवितों. कलेक्टरसाहेबांनीं बरें आहे म्हणून सांगितलें. नंतर नानासाहेब एक दिवस शिरडीस गेले, व श्रीचरणीं मस्तक ठेऊन त्यांनीं ही सर्व हकीकत त्यांचे कानावर घातली व विनंति केली. कीं, बाबा कसें करावें; टोंचून घ्यावें कीं घेऊं नये. बाबा म्हणाले, "अं: त्यांत काय आहे. टोंचून घ्यावें. त्यापासून आपल्याला काय व्हायचें आहे. जा खुशाल टोंचून घे. कांहीं भिऊं नकोस. ठीक आहे असें म्हणून नानासाहेबांनीं बाबांस पुनरपि वंदन करून ते नगरास परत आले, व आपला प्लेगची लस टोंचून घेण्याचा निश्चय झाला आहे असें त्यांनीं कलेक्टर साहेबांस कळविलें, व एक दिवस कायम करून त्या दिवशीं नानासाहेबांनीं स्वतःस टोंचून घेतलें. नानासाहेबांचा हा निश्चय व उदाहरण पाहून त्यांचे कचेरींतीलही पुष्कळ मंडळींनीं टोंचून घेतलें व गांवांतीलही बऱ्याच लोकांवर नानासाहेबांच्या स्वतः टोंचून घेण्याचा चांगला परिणाम होऊन त्यांनींही टोंचून घेतलें. मजा ही कीं त्यावेळीं जेवढया लोकांनीं टोंचून घेतलें होतें त्यांपैकीं एकावरही अनिष्ट परिणाम झाला नाहीं. नाना-

साहेबांस तर तापही आला नाहीं व त्यांचा हातही सुजला नाहीं. कलेक्टर साहेबही खूष झाले. नानासाहेब अंधश्रद्धा ठेवणारे गृहस्थ नव्हते. स्वतःचे विचारास व अनुभवास गोष्ट पटली तरच विश्वास ठेवावयाचा अशांपैकीं ते एक होते.

पहिली गोष्ट जरी त्यांस फारशी पटली नाहीं तरी दोन वर्षें नादुरस्त म्हणून ठेवून दिलेल्या काळ्या अल्पाकाचाच अंगरखा घालण्याची आपणास कां इच्छा व्हावी, व बदामखडीसाखरेची पुडी त्यांत इतके दिवस कां रहावी. साधुदर्शनास रिक्तहस्त जाऊं नये व मी तर रिक्तहस्त चाललों आहे. मीं साधूकडे चाललों आहे का फकिराकडे चाललों आहे या गोष्टीचाही निर्णय थोडाबहुत त्या पुडीनें कां करावा वगैरे विचारांचें रण त्यांचे अंतःकरणांत माजून राहिलें होतेंच हें वर लिहिलेंच आहे.परंतु प्लेगची लस टोंचून घेण्याबदलच्या बाबांच्या बोलाचा जेव्हां त्यांस पूर्ण अनुभव आला तेव्हां बाबा हे कोणीतरी एक निवळ फकीर नाहींत, असें त्यांस वाटलें. परंतु ते पूर्ण मुक्त व साधूच आहेत असा निश्चय झाला नाहीं. निवळ फकिरापेक्षां बाबांचें तेज निराळें आहे व त्यांचेकडे आपण जात जावें असें मात्र त्यांस वाटूं लागलें व पुढें थोडयाच अवधींत त्यांस पदोपदीं अनुभव येऊं लागल्यामुळें बाबा हे पूर्ण जीवनमुक्त आहेत, विदेही आहेत, विरक्त आहेत, मूर्तिमत परब्रह्म आहेत असें त्यांस वाटून त्यांची बाबांचे चरणी अप्रतीम व अढळ श्रद्धा जडली. व नानासाहेब हे बाबांचे सच्छिष्यांपैकीं अव्वल दर्जाचे शिष्य त्यांच्या ( नानासाहेबांच्या ) हयाती पर्यंत कायम राहिले. श्रद्धा ढळण्याचे कित्येक प्रसंग आले; परंतु नानासाहेबांची श्रद्धा त्यांचे अंतकालापर्यंत दृढ, निस्सीम व अढळच राहिली, हें मी पुढें नानासाहेबांसंबंधाच्या मला माहीत असलेल्या म्हणजे त्यांच्याच मुखांतून वेळोवेळीं श्रवण केलेल्या व त्यांपैकीं कांहीं स्मरणांत असलेल्या व कांहींचें टिपण करून ठेविलेल्या आणखी लीला लिहिणार आहे,त्यावरून सिद्ध होईलच.

बाबांच्या लीला म्हणजे गारुडयाचे नजरबंदीचे खेळ नव्हत किंवा त्यांचें तें चमत्कारचरित्रही नव्हे. त्यांचा प्रत्येक बोल म्हणजे तें एक वेदवाक्यच होय. व त्यांची एकेक लीला म्हणजे जगाच्या इतिहासांतील एक अमूल्य सिद्धांतरत्नच होय. ती लीला म्हणजे परमात्म्याच्या अकृत्रिम व अलौकिक कर्तृत्वशक्तीचें मूर्तिमंत चित्रच होय. ती लीला म्हणजे आत्मबोधरसांनीं ओथंबलेलें असें एक पक्वान्नच होय. पूर्वजन्मींच्या परम भाग्यावांचून अशीं पक्वान्नें चाखावयास सांपडणें कठीण. नानासाहेब परम भाग्याचे म्हणूनच त्यांस अशा पक्वान्नांची वेळोवेळीं बाबांकडून सतत २० वर्षें मेजवानी होत असे. असो. आतां फक्त आणखी एकच अनुभव लिहून हा फार लांबलेला लेख पुरा करतों.

नगर जिल्ह्यांत चिटणिसीचे कामावर असतांना एकदां हरिश्चंद्राचे डोंगरावर जाण्याचा नानासाहेबांचा निश्चय झाला. त्यांनीं हा बेत रा. रा. बाबा खरवंडीकर वगैरे आफिसांतील मंडळीस सांगितला. ते दिवस कडक उन्हाळ्याचे होते. बाबा म्हणाले, असल्या उन्हाळ्यांत हरिश्चंद्राचे डोंगरावर जाणें चांगलें नाहीं. एक तर डोंगर चढण्यास फार कठीण, वाटा अवघड, रानांतील अरुंद वाटा, कडे तुटलेले. दुसरी गोष्ट ऊन्ह प्रखर. आपली निघण्याची वेळ म्हणजे भर उन्हाचे प्रहरीं. तहानेनें जीव व्याकूळ होणार. पायथ्यापासून थेट माथ्यापर्यंत वाटेंत कोठेंही पाण्याचा बिंदु मिळणार नाहीं. हाल होतील. डोंगर चढण्यानें थकवा येणार. थकवा आल्यास वाटेंत बसण्यास छायेचें झाडही मिळणार नाहीं. यावेळीं वाटेंत मनुष्य सुद्धां भेटणार नाहीं. तरी या सर्व गोष्टींचा विचार करून जें करणें तें करावें. या सर्व गोष्टींचा विचार करून नानासाहेबांनीं त्याच वेळीं व त्याच दिवशीं जाण्याचें ठरविलें. बहुतकरून प्रत्येक गोष्ट नानासाहेब बाबा खरवंडीकरांस विचारून त्यांचा सल्ला घेऊन करीत. व बाबाही त्यांस योग्य सल्ला देत. बाबा त्या बाजूचे माहितगार, विनयशील, विनोदी व स्पष्टवक्ते. आपण सांगितलेल्या अडचणी नानासाहेबांना पटत नाहींत व अडचणीस न जुमानतां नानासाहेबांचा

हरिश्चंद्रावर जाण्याचा निश्चय दिसतो असें पाहून बाबांनींही जास्त आढेवेढे न घेतां हरिश्चंद्रावर जाण्याची तयारी करण्यास सुरुवात केली. जरूर तें सामान व नेहमीची मंडळी बरोबर घेऊन ठरल्यावेळीं नानासाहेब पर्वतारोहणास निघाले. जातां जातां अर्ध्या रस्त्यावर गेले असतील तों नानासाहेबांस तहानेनें व्याकूळ केलें. ते बाबा खरवंडीकरांस म्हणाले, बाबा कांहीं करा पण मला थोडेंसें पाणी पिण्यास द्या. उन्हानें खरोखरच माझा प्राण व्याकूळ झाला आहे. माझ्याच्यानें पुढें एक पाऊल सुद्धां टाकवत नाहीं. बाबा म्हणाले, नानासाहेब मी आपल्यास प्रथम ही गोष्ट सांगितली होती. सर्व अडचणींचें चित्र आपल्यापुढें पूर्णपणें रेखाटलें होतें. मला या प्रांताची चांगली माहिती आहे. कुठें केव्हां कशा अडचणी येतात त्याची जाणीव आहे. पण आपण आग्रहच धरून बसलांत म्हणून मला आपल्या म्हणण्यास संमती देणें भाग पडलें. परंतु सरते शेवटीं फजिती व त्रास होण्याची वेळ आली ती आलीच. आतां आपण जवळ जवळ अर्ध्या रस्त्यावर आलों आहोंत. या वाटेंत कोठेंही पाणी नाहीं. आडवाटेला पाणी असल्यास आपल्यास आडवाटेची माहिती नाहीं. आपल्यास आडवाटा दाखविण्यास येथें कोणी मनुष्यही नाहीं. अशा स्थितींत मी पाणी कोठून आणूं. तेथून वर माथ्यापर्यंत जाण्यास किंवा परत पायथ्यापर्यंत जाण्यास वेळ सारखाच लागणार. करितां आपल्यास तोंपर्यंत धीर धरून वेळ काढणें भाग आहे. बाबांचे हे निराशेचे शब्द ऐकून नानासाहेब चालूं लागले. परंतु ऊन कडक-घटकाभर विश्रांती घेण्यास छायेचें झाड नाहीं, तृषेनें प्राण क्षणोक्षणीं व्याकूळ होई, पाऊल पुढें पडेना. नानासाहेब थकले, व वाटेंतच एका दगडावर बसले. म्हणूं लागले, बाबा जीव फार कासावीस होत आहे. कसेंही करा व कोठून तरी मला थोडेंसें पाणी आणून द्या. माझें पाऊल पाणी मिळाल्यावांचून पुढेंही पडत नाहीं व मागेंही जात नाहीं. काय हो माझे " बाबा" जर यावेळीं येथें असते तर ते मला खात्रीनें याच ठिकाणीं पाणी देते. पण मी आतां काय करूं. माझ्यानें

आतां येथून हलवतच नाहीं. बाबा खरवंडीकरांनीं परोपरीनें पुष्कळ सांगितलें; परंतु नानासाहेब तेथून हलेचनात. बाबा म्हणाले, नानासाहेब असें काय करतां. जी गोष्ट येथें मिळण्यासारखी नाहीं तिचा हट्ट घेण्यांत काय मतलब. "बाबा" येथें असते तर ते आपल्यास येथेंच पाणी देते ही गोष्ट जरी खरी मानली तरीही ही गोष्ट तितकीच खरी आहे कीं, "बाबा" हल्लीं येथें नाहींत. ते शिरडींत आहेत. शिरडींत व येथें फार अंतर आहे. करितां विनाकारण भलताच हट्ट धरूं नका. एक तर वरतीं चढण्या-करितां चालूं लागा किंवा खालीं परत फिरा. अर्ध्या रस्त्यांत भलताच हट्ट घेऊन तो पुरवणार कोण; असें आपण करूं नका. आपल्यास तहानेंमुळें त्रास होत आहे याबद्दल आम्हां सर्वांसच फार दिलगिरी वाटते. पण आम्ही या जंगलांत करणार काय ? नानासाहेब म्हणाले, पाणी मिळाल्यावांचून मी येथून हलणार नाहीं. बाबांची व इतर सर्व मंडळीची नानासाहेबांचे हे निर्वाणीचे शब्द ऐकून फारच त्रेधा उडाली. कोणाचाच उपाय चालेना. सर्व निराश होऊन बसले. इतक्यांत एक भिल्ल डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन त्याच जंगलांतून आडवाटेनें त्याच वाटेकडे येतांना या मंडळीचे नजरेस पडला. नानासाहेबांनीं त्यास सहज विचारिलें कायरे गडया मला फार तहान लागली आहे. येथें कोठें जवळपास पिण्यास थोडेसें पाणी मिळेल काय ? तो भिल्ल म्हणाला, "संग, तूं बसला आहेस त्या दगडाखालींच तर पाणी आहे" असें म्हणून तो मोळक्या भिल्ल तेथून चालता झाला. सर्व मंडळींनीं तो दगड वर उचलून पाहिलें तो खरोखरच एक मनुष्याची तहान भागण्या पुरतेंच तेथें स्वच्छ व मधुर असें थोडेसें पाणी होतें. तें पाहून नानासाहेबांस व इतरांसही परमा-नंद झाला. नानासाहेब पाणी प्याले व शांत झाले. सर्वत्रांना हें गूढ उकलेना. हा काय चमत्कार ? फक्त नानासाहेबांची तृषा भागण्यापुरतेंच व तेंही नाना-साहेब बसलेल्या दगडाखालींच शुद्ध, स्वादु व निर्मळ जल त्याचवेळीं कसें निर्माण झालें याचें सर्वांसच राहून राहून सकौतुकाश्चर्य वाटलें. भिल्लाचा तपास

करतां भिल्ल कोठेंच दिसेना. नानासाहेब म्हणाले पहा, माझे "बाबा" खरे आहेत का नाहींत. त्यांनीं मला येथल्या येथेंच पाणी दिलें कीं नाहीं. बाबांचेवरील नानासाहेबांची निस्सीम निष्ठा पाहून व "बाबा" जरी शिरडींत असले तरी ते सर्वव्यापक आहेत व परमभक्तवत्सल आहेत, भक्ता-करितां वाटेल त्या वेषानें येऊन वाटेल तें निर्माण करून त्यांची पीडा दूर करितात, याबद्दल बाबा खरवंडीकर वगैरे मंडळीची पुरी पुरी खात्री झाली. नंतर नानासाहेब सर्व मंडळीसह हरिश्चंद्राच्या माथ्यावर जाऊन सायंकाळीं पुन्हा परत गेले. "बाबा" सगुणपरमात्मा मूर्ति आहेत, ते संतश्रेष्ठ विभूती आहेत, ते साक्षात् सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सच्चिदानंद परब्रह्म असून केवळ भक्तोद्धाराकरितांच शिरडींत मानुष तनूंत अवतीर्ण झाले आहेत अशी त्यांची खात्री झाली, तेव्हांपासून त्यांची बाबांवर अचल श्रद्धा बसत चालली. अद्वितीय प्रेम वृद्धिंगत होत गेलें, अलोट व अढळ निष्ठा दृढावत चालली व केवळ बाबा सगुण होऊन मानवी कायेंत अवतरले आहेत, यामुळें लोकांस त्यांचें ऐश्वर्य, सत्ता, सामर्थ्य व अगाध ज्ञान याची जाणीव होत नाहीं असें त्यांना वाटलें. उत्तरोत्तर बाबांच्या अद्वितीयत्वाबद्दल त्यांस पदोपदीं चांगलाच अनुभव येऊं लागला.

**अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानंतो ममभूत महेश्वरम् ॥**

श्री. भ. गी. अ. ९ श्लो. ११

खरोखरच वर लिहिलेल्या श्लोकांतील गीतातत्वाप्रमाणें बाबांचें भूत-महेश्वरत्व केवळ त्यांच्या मानुष तनूच्या आश्रयामुळें लोकांस लवकर पटूं नये यांत नवल काय !

असो. नानासाहेबांची तृषार्ततेमुळें हरिश्चंद्रगडाचे अर्धे रस्त्यावर ह्या दिवशीं वर लिहिल्या प्रमाणें स्थिति झाली असतां त्याच दिवशीं त्याच

वेळीं शिरडींत विलक्षण प्रकार घडून आला. बाबा मशिदींत बोलूं लागले, "काय करावें नानाला तहान लागली, नानाचा जीव कासावीस झाला, पाण्या-वगर नाना थकला. ऊन फार लागलें. त्याला आतां थोडें तरी पाणी दिलें पाहिजे." मशिदींत जमलेल्या लोकांपैकीं कोणासच बाबा काय बोलतात तें कळेना. जो तो आपल्या मनांत विचार करूं लागला; परंतु साइजगच्चालकाच्या अतर्क्य ब्रह्मांडसाक्षित्वाची व भक्तवत्सलतेची संगति अज्ञानी जीवांना कशी लागावी! कांहींस असें मात्र वाटे कीं, हा कांहींतरी प्रकार नानासाहेबांसंबं-धानें असावा. नानासाहेब पाण्यासंबंधानें अशा अडचणींत त्यावेळीं कोठें तरी असतील अशी कोणासही कल्पना नाहीं. त्यामुळें हा काय प्रकार आहे याची अटकळ कोणास करतां येईना. बाबांच्या कल्पनातीत ज्ञानाची व निरुपम-ऐश्वर्याची ज्यांस जाणीव नाहीं अशी मंडळी "बाबा केव्हां तरी कांहीं तरी बोलतात" असेंही म्हणूं लागली. परंतु बाबांच्या मुखांतून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द वेदवाक्य, अतएव सार्थ आहे अशी ज्यांची भावना होती त्यांना मात्र वाटलें कीं ही गोष्ट खुद्द नानासाहेबांसच विचारून खुलासा करून घेतला पाहिजे. पुढें कांहीं दिवसांनीं नानासाहेब बाबांच्या दर्शनाकरतां शिरडीस आले व महाराजांच्या चरणीं मस्तक ठेवतांच महाराज म्हणाले, "कां नाना पाणी मिळालें का?" नानासाहेबांच्या नेत्रांतून आनंदाश्रू वाहूं लागले. ते म्हणाले, बाबा आपल्या सारखी गुरुमाय मजला सुदैवानें लाधली असतांना मला पाणी कां मिळणार नाहीं? या प्रमाणें उभयतांचें बोलणें चाललें असतां हें कोडें काय आहे हें कोणासच उमगेना. मग कांहीं जिज्ञासु व श्रद्धाळु मंडळींनीं अमुक दिवशीं अमुक वेळीं "कसें करावें, नानाला तहान लागली आहे, पाण्यावगर त्याचा जीव कासावीस होत आहे" असें बाबा म्हणत होते हें काय असें विचारल्यावरून नानासाहेबांनीं वर लिहिल्याप्रमाणें घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. तेव्हां हें कोडें उलगलें व बाबांच्या अगम्य लीलेबद्दल सर्वांस सानंद कौतुक वाटलें.

खरोखरच भक्तांसाठीं संकटसमयीं परमात्मा महाराचें सोंग घेऊन हुजूर कचेरींत पैशाची भरपाई करून सर्व पैसे पोंचल्याची पावती घेऊन भक्तांस नेऊन देतात, त्यांत व भयंकर तृषार्ततेनें व्याकूळ झालेल्या भक्तांस मोळीविक्या भिल्लाचें सोंग घेऊन बसलेल्या जागींच पाणी देऊन त्याची पीडा दूर करणें यांत फरक काय! पुन्हा हा सर्व प्रकार, बाबांचे ब्रह्मांडांतील सर्व व्यापी निर्गुणत्व न मोडतां, व शिरडींतील साडेतीन हातांचें सगुण मूर्तित्वही न मोडतां, होत आहे, हें पाहून बाबांच्या अलौकिक सामर्थ्या-बद्दल कोणा सहृदय भक्ताचें अंतःकरण प्रेमानें व आनंदानें उचंबळून येणार नाहीं ! व कोणा श्री.ज्ञानेश्वरी भक्तांस श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं पांचवे अध्यायां तील १५ वे श्लोकावरील भाष्यांत,

**"पैं मूर्तीची नि मेळें। तो मूर्तच होऊन खेळे।**
**परी अमूर्तपण न मैळे। दादुलयाचें ॥**

एक्यायशीव्या ओंवींत लिहिल्याप्रमाणें साक्ष पटणार नाहीं ?

पृथ्वी

त्वदालयिं न ये, रुसे, तव न आयके, दार, गा।
श्वशूरगृहिं होउनी वससि बद्रिकेदार गा।
असा दिससि स्त्रैण तूं परि अलिप्त योगेश्वरा।
अशा तुज सहस्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ १ ॥

करालँ स्वरुपास तूं धरुनि विश्व संहारिसी।
परी यवन--भूमिपा भिउनि गा उडी घालिसी।
पवित्र मणिकर्णिके मधिं, किं काशि विश्वेश्वरा
अशा तुज सहस्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ २ ॥

सदा भुवन–नाटकीं कितिक घेसि रूपा खंगा।
अवंतिप परी जगीं प्रथित तूं महाकाल गा।
अगा चतुर चिन्मणे, चपल–चित्त–चिंता हरा।
अशा तुज सहस्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥३॥

---

( १ ) तुझ्या वरीं २ बायको पार्वती=हिमालय कन्या, ३ हिमालयावर ४ उग्र ५ मुसलमान बादशहा महंमद घोरीला त्यानें ६ वी स्वारी हिंदुस्थानावर ११९४ त केली व त्यावेळीं विश्वेश्वराचें देवालय भ्रष्ट केलें ६ आकाशांतगमन करणाऱ्या सूर्यनारायणा ७ उज्जनीचें पालन करणारा ८ प्रख्यात.

द्विदारं परि एक ती अति–चला दुजी गा स्थिरा ।
द्विपुत्रं परि एक षण्मुख दुजाहि लंबोदरा ।
गृहीं न सुख, नर्मदा तटिं निवास ओंमेश्वरा ।
अशा तुज सहस्त्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ४ ॥

प्रभासिं तव मंदिरा, तवतनूस, ही दुर्मदे ।
विभंगुनि मं हं मदें धन अपार नेलें मुदें ।
जरी भुवन–मल्ल तूं लपसि भीरु सोमेश्वरा
अशा तुज सहस्त्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ५ ॥

उपकृति–मलक्षयास्तव महामुनी सत्तमे ।
वरूनि भुविं आणिली विमल गौतमी गौतमे ।
सवेग शमवी नगीं वसवि त्र्यंबकाधीश्वरा ।
अशा तुज सहस्त्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ६ ॥

विकारवश तूं नसे मग स्मरासि कां जाळिलें ।
सजीव करुनी तया मग उमेसि कां पर्णिलें ।

---

१ दोन बायका. २ एक अति चंचल डोक्यावर बसलेली गंगा. ३ दुसरी मुळींच जाग्यावरून न हालणारी पर्वतकन्या पार्वती. ४ दोन मुलगे ५ सहा तोंडांचा कार्तिकस्वामी. ६ लांब व मोठ्या पोटाचा गणपति. ७ ओंकारेश्वर ८ प्रभासपट्टनांत ९ मदोन्मत्त होऊन १० गिझनीचा राजा महंमदानें (१०२४ सालीं जी स्वारी केली त्यांत.) ११ आनंदानें १२ भेकड १३ उपकार १४ पापनाश १५ गोदावरी १६ त्र्यंबकेश्वराचे डोंगरावर १७ कामास.

स्मरा भिउनि काननीं पळसि गा भिमाशंकरा।
अशा तुज सहस्र--धा नमन साइ--चंडीश्वरा ॥ ७ ॥

गदां जठर भेदिलें लुटुनि गेह विध्वंसिलें ।
प्रभासि गिझनी नृपें तरि पुन्हां कसें दाविलें ।
मुखा यवन वैरुळीं शिव शिवेश घृष्णेश्वरा ।
अशा तुज सहस्र--धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ८ ॥

दशद्वय प्रसिद्ध ही जगतिं ज्योति–लिंगें अगा ।
विभिन्न स्थळिं भिन्न तूं धरुनि: नाम श्रीशैलिंगा ।
निवास करि मल्लिकार्जुन चि मद्रदेशांतरा ।
अशा तुज सहस्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ९ ॥

जळीं यवन भीतिनें लपसि ऐकिली मात रे ।
पुन्हा प्रगटसी कसा यवन मोंगलाईत रे ।
विचित्र चरिता विभो परळि वैजनाथेश्वरा ।
अशा तुज सहस्त्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ १० ॥

विपत्ति धन आणितें म्हणुनि तूं तया त्यागिसि ।
दिगंबर बनूनि निर्भय असंग तूं राहसी ।
अगा यवन–भू मधें, अवंढि नागनाथेश्वरा ।
अशा तुज सहस्र–धा नमन साइ–चंडीश्वरा ॥ ११ ॥

---

१ गोष्ट २ मोंगलाईंत.

गुरो रुचिर संगमें उदधि ताम्र–पर्णीचिया।
त्वरें रघुविरें शरें सुगम सेतु बांधोनियां।
तिर्थेच तुज स्थापि तो तुज समर्पि रामेश्वरा।
अशा तुज सहस्र--धा·नमन साइ--चंडीश्वरा ॥ १२ ॥

प्रथम दिलेल्या नऊ व खालीं दिलेल्या बारा मिळून एकंदर संस्कृत व प्राकृत श्लोकरूपी एकविंशति दलांचें निरनिराळ्या रंगाचे वाक्पंकज व मध्यंतरीं दिलेल्या दोन लीला श्री समर्थ सच्चिदानंद सद्गुरु दत्तज्ञान साइ चरणारविंदीं अनन्यभावानें अर्पण करून आपली रजा घेतों.

ठाणें १८-३-२६ } बाबांचें बाळ.

## ॥ श्रीसद्‌गुरूसाईनाथायनमः ॥

### डॉक्टर हरी बापुराव शिरसाठे यांचा अनुभव.

माघ महिन्यांत श्रीगुरुचरित्राचें अनुष्ठान बसविलें. तें चाललें असतांना रात्रंदिवस बाबांच्या समोर तुपाची वात ७ दिवस होती.परंतु अनुष्ठान संपण्याच्या दिवशीं पहाटेस सुमारें तीन वाजतां स्वप्नांत एक ओवी ऐकण्यांत आली ती अशाः–**"चालतांना अनुष्ठान॥ घालवं नये दिवा जाण॥होती मनोरथपूर्ण निश्चयेसीं ॥"** ओवी ऐकल्या बरोबर मी जागा होऊन पाहातों तों बाबांच्या समोरचा दिवा विझला होता. मनास फार वाईट वाटून तो दिवा मी तावडतोब लाविला. अनुष्ठानास आरंभ होऊन ४ दिवस झाले नाहींत तोंच रात्रीं २ वाजतां एक दृष्टांत झाला कीं--वरिष्ठ जागेसाठीं एक अर्ज पाठीव, तो गुरुवारीं अनुष्ठान संपल्यावर पोष्टांत टाक. आज्ञेप्रमाणें अर्ज पाठविला. ती जागा १ एप्रील पासून व्हायची होती. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी यांनीं येऊन काम पाहिलें. ते कांहीं बोलले नाहीं. बरोबर असलेला कारकून म्हणाला कीं, ह्या एका जागेसाठीं १२।१४ जणांचे अर्ज आले आहेत.तुम्हांस मिळेलच किंवा नाहीं ही शंका आहे. कारण तुमचा नंबर वरान खालीं आहे. हें ऐकल्यापासून मन फारच खट्टू झालें. अशा स्थितींत बाबांची पूजाअर्चा बरोबर जशी त्रिकाल व्हावी तशी होण्यास अंतर पडूं लागलें. पुढें दोन आठवड्यांनीं पहाटे पांच वाजतां फारच तेजस्वा असा एक १७।१८ वर्षांचा मुलगा स्वप्नांत आला व त्यानें सांगितलें कीं, "काळजी करूं नकोस,तुला जागा मिळाली.सेवेंत अंतर पाडूं नकोस." मी विचारलें कीं, आपणास कोणी सांगितलें? त्यानें उत्तर दिलें कीं, "जलालोदीन ऑफ जळगांव" त्यांनीं आपणांस सांगण्यास मला पाठविलें. मी त्यास बसण्यास सांगितलें; परंतु तो न वसतां बोलतां बोलतां जागच्या जागींच अदृश्य झाला व मीही एकदम जागा झालों. मी हें स्वप्न दोन चार जणांस सांगून त्याचा अर्थ विचारला. परंतु:प्रत्येकानें सांगितलें कीं यांत कांहीं अर्थ नाहीं. पुढें २ आठवड्यानंतर एके दिवशीं ( सोमवार तारीख २९ मार्च रोजीं पहाटेस पूजा करीत असतांना असा चमत्कार झाला कीं बाबांच्या फोटोंत डोळ्याच्या पापण्या वर

खालीं झाल्या म्हणून पुन्हा एकाग्रतेनें पाहूं लागलों. तों पुन्हा पापण्या हालल्या. असें तिनदां झालें. दुपारीं तसाच भास झाला.मग मी प्रार्थना केली कीं, "बाबा मी अंधळा आहे. आपण काय म्हणतां हें समजत नाहीं. व महदाश्चर्यानें हृदय भरून आलें. संध्याकाळीं असेंच ३ वेळां झालें. असें तीन दिवस चाललें होतें. मला अर्थ समजेना. चवथ्या दिवशीं म्हणजे गुरुवारीं १ एप्रील रोजीं कांहीं एक दिसलें नाहीं. मनास हुरहुर व तळमळ लागून राहिली. कोणास काय विचारावें व कसें विचारावें हें समजेना. रात्रीं कांहीं स्वप्न अगर दृष्टांतही होईना. सुमारें १० वाजतां पोष्टांतून वरीष्ठ जागा मिळाल्याची ऑर्डर आली. ती पाहिल्या बरोबर बाबांच्या डोळ्यांच्या खुणांचा उलगडा झाला. ही जागा १५ दिवस अगोदर भरावयाची होती. म्हणून मला वाटलें कीं जागेवर कोणीतरी नेमला असेल व आपल्यास खास मिळाली नाहीं. म्हणून मन खट्टू झालें होतेंच तें, ही ऑर्डर व बाबांच्या अतर्क्य लीला पाहून ओतप्रोत प्रेमानें व भक्तीनें भरून आलें तें लिहिणें अशक्य आहे. दुसरे दिवशीं काशिनाथ बाबा यांचें पत्र आलें कीं मंगळवारीं रात्रीं शेजारती करून ते निजले असतांना रात्रीं सुमारें १२ वाजतां त्यांस असा दृष्टांत झाला कीं, मी दुपारचे आरतीचे वेळीं बाबांवर चवरी वारीत आहें. आरती संपल्यावर बाबांनीं माझ्या हातांत एक केळें दिलें व काशिनाथ बाबांकडेस ( ते थोडे लांब बसले होते ) एक पेरू टाकून आज्ञा केली कीं "तूं आतां जा. तुमचे मनोरथ पूर्ण होतील." असें त्यांचें कार्ड आलें व मजला मामांनीं विचारिलें कीं, तुला काय अनुभव किंवा दृष्टांत या चार दिवसांत झाला असल्यास तावडतोब लिहून कळीव. त्या प्रमाणें मी त्यांस लिहून कळविलें. ही वरीष्ठ जागा मजला मिळावी म्हणून गुरुमूर्ती काशिनाथ मामा यांनींही कांहीं अनुष्ठान केलें होतें.

ते माझ्या साठीं रोज त्रिकाल बाबांच्या जवळ प्रार्थना करीत कीं, "बाबा माझ्या हरीला तुम्ही फार लांब नेऊन टाकलें. त्यास माझ्याजवळ आणून त्याचे मनोरथ पूर्ण करा." त्या प्रमाणें बाबांनीं मजला इन्स्पेक्टरचा चान्स देऊन अहमदनगरास बदली केली. तेथील राहाण्याचा बंगला गांवापासून

थोडया अंतरावर आहे. म्हणून कुटुंबाच्या मनांत येऊं लागलें कीं हे ( मी ) फिरतीवर जाणार व मग ५ मुली व मी एकटीच राहाणार. दिवसा कांहीं भीति नाहीं; परंतु रात्रीस भीति वाटण्याचा संभव फार आहे. अशा अनेक कल्पना येऊं लागल्या व मन फार व्यग्र होऊं लागलें. अशा स्थितींत ८।१० दिवस गेले; परंतु तळमळ कमी न होतां दिवसेंदिवस जास्तच काळजी करूं लागली. परंतु एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं पहाटेस ४ वाजतां एक ब्राह्मण सौभाग्यवतीचे स्वप्नांत आला. त्याची कांती म्हणजे १०० नंबरी सोन्यासारखी अगदीं पिवळी व अत्यंत तेजस्वी होती. त्यानें सोभाग्यवतीस सांगितलें कीं, जा. जा. मी अर्ज करून सर्व व्यवस्था लावीन. उगीच काळजींत बसूं नकोस. अनुष्ठान बसलें असतांना सौभाग्यवतीस दृष्टांत झाला कीं, "एकदां मी तुजला सांगितलें कीं तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. असें असून तुम्हीं कां मनास तळमळ लावून घेतां. माझ्यावर भरंवसा ठेवा व स्वस्थ रहा. वेळ आली म्हणजे सर्व कांहीं मनाजोगें होईल. काळजी करून भक्तींत अंतर करूं नका. अशारीतीनें बाबा वारंवार दृष्टांत देऊन गरीब दासानुदासावर प्रेम करितात व जे त्यांच्या भजनी लागतात त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करितात. यावरून स्पष्ट दिसून येईल कीं, हा दत्तमहाराजांचा अवतार असून समाधिस्त झाल्यास आज ८ वर्षें झालीं. तरी जे त्यांच्या पूर्ण भजनीं लागतात त्यांचे सर्व हेतु पूर्ण करून लहान लेंकरा प्रमाणें त्यांचें पालन करितात. ६ महिन्यांत निदान बारीक सारीक असे अनुभव वारंवार फार येतात. त्यांपैकीं कांहीं सवडीनुसार आपणाकडेस लिहून पाठवीन.

# अध्याय ४० वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

धन्य धन्य श्रीसाईसमर्थ । ग्रंथरूपें स्वार्थ परमार्थ ॥
बोधूनि भक्तां करी कृतार्थ । जो कृतकार्यार्थ संपादी ॥ १ ॥

माथां पडतां जयाचा हात । करी जो तात्काळ शक्तिपात ॥
अप्राप्यवस्तू करी प्राप्त । भेदाचा निःपात करूनी ॥ २ ॥

विरवूनि मी तूं भावभिन्न । जया करितां साष्टांग नमन ॥
हृदयीं धरी आलिंगून । अनन्य शरण रिघतांची ॥ ३ ॥

नावें भिन्न सागरसरिता । परी रूपें एकरूपता ॥
वर्षाकाळीं मिळणी मिळतां । उरे न भिन्नता तादृश ॥ ४ ॥

तेवींच भावें सद्गुरुनाथा । भक्तीं अनन्य शरण जातां ॥
तोही भक्तांस देई निजगुरुता । पाहोनि सद्भक्तता भक्तांची ॥ ५ ॥

जयजयाजी दीनदयाळा । भक्तोद्धारा परमप्रेमळा ॥
व्यापूनि अखिल ब्रह्मांडमाळा । वससी निराळा शिर्डींत ॥ ६ ॥

जातें मांडूनि पाय पसरितां । संत असतां दळण दळितां ॥
खुंटा ठोकूनि वैरा रिचवितां । विस्मय चित्ता माझिया ॥ ७ ॥

तेंच कीं या ग्रंथामूळ । मनीं इच्छा उद्भवली प्रबळ ॥
कीं हीं ऐसीं कर्मे सकळ । वर्णितां कष्मल हरेल ॥ ८ ॥

हरी स्वयें होईल प्रसन्न । तया आवडे तयाहून ॥
कोणी केलिया निजभक्त कीर्तन । अथवा गुणवर्णन भक्तांचें ॥ ९ ॥

आशंकतील श्रोते सज्जन । जयां निराधार वाटेल हें विधान ॥
तिहीं पहावें भविष्योत्तर पुराण । त्रिपुरारी कथन करी हें ॥ १० ॥

ही ही सकळ साईची प्रेरणा । परी लौकीकरीती निदर्शना ॥
तेणेंच अनुमोदिली ही रचना । भक्त कल्याणाकारणें ॥ ११ ॥

तैं पासाव मासोमासीं । साई समर्थ कथानकासीं ॥
या श्रीसाईलीलावलीसीं । श्रोते बहु प्रेमेसीं परिसती ॥ १२ ॥

तोचि कीं साई अनुमोदिता । तोच तो माझा बुद्धिदाता ॥
तोच मूळ चेतना चेतविता । तयाची कथा तोच करी ॥ १३ ॥

कीं हा हेमाड निजमतीं । रचितो हा विकल्प न धरा चित्तीं ॥
म्हणोनि श्रोतयां करितों विनंती । गुणदोष माथीं मारूं नका ॥ १४ ॥

गुण तरी ते साईचे । दोष दिसलिया तरी ते त्याचे ॥
मी तों बाहुलें साईखड्याचें । आधारें नाचें सूत्राच्या ॥ १५ ॥

सूत्रधारा हातीं सूत्र । त्याला वाटेल तें तें चित्र ॥
रंगीबेरंगी अथवा विचित्र । नाचवील चरित्र समन्वित ॥ १६ ॥

असो आतां हा प्रस्ताव । काय नूतन कथा नवलाव ॥
उत्कंठा प्रचुर श्रोतृस्वभाव । गुरुभक्त गौरव त्यां गाऊं ॥ १७ ॥

गताध्याय पूर्ण करितां । पुढील अध्याय सूतोवाचता ॥
ठेविली होती स्मरणाचे माथां । स्फुरे ती आतां परिसावी ॥ १८ ॥

आतां हें गोड आख्यान । श्रोतां परिसिजे सावधान ॥
भक्तप्रेमें घालितां भोजन । परम समाधान साईस ॥ १९ ॥

निज तान्हिया कनवाळू माई । तैसा निजभक्तां प्रत्यक्ष साई ॥
वसो कुठेंही धांवत येई । कवण त्या होईल उतराई ॥ २० ॥

देहें वावरत शिर्डींत । परी संचार त्रैलोक्यांत ॥
ये अर्थींचा गोड वृत्तांत । परिसा निज शांत मानसें ॥ २१ ॥

एकदां साईपदसंनिष्ट । बाळासाहेब[1] भक्त श्रेष्ठ ॥
माता जयांची व्रतवैकल्यनिष्ठ । सर्वांचें अभीष्ट संपादी ॥ २२ ॥

परोपरीचीं अनेक व्रतें । होतीं घडलीं तियेचे हातें ॥
तयांचें उद्यापन राहिलें होतें । सांग तीं समस्तें व्हावया ॥ २३ ॥

व्रतसंख्या होतां पूर्ण । करूं लागे उद्यापन ॥
ना तों पदरीं न पडे पुण्य । व्रत तें अपूर्ण त्यावीण ॥ २४ ॥

व्रतें पंचवीस अथवा तीस । इतुक्यांचिया उद्यापनास ॥
देव शें दोनशें ब्राह्मणांस । जेवावयास आमंत्रित ॥ २५ ॥

म्हणून एक नेमिली तिथी । हें उद्यापन करावया प्रती ॥
देव जोगांस[2] पत्र लिहिती । कराया विनंती बाबांस ॥ २६ ॥

पहा आपण आलियाविना । नाहीं सांगता या उद्यापना ॥
तरी मान्य करूनि ही प्रार्थना । करावें या दीना आभारी ॥ २७ ॥

मी तो सरकाराचा सेवेकरी । पोटालागीं करितों चाकरी ॥
त्यांतचि साधल्या परमार्थहि करीं । जाणतसां अंतरीं आपणही ॥ २८॥

डहाणूहून इतुका दूर । स्वयें यावया मी लाचार ॥
तरी या आमंत्रणाचा स्वीकार । कराल ही फार मज आशा ॥ २९ ॥

ऐसें बापूसाहेब जोग । पत्र बाबांस ऐकवितो सांग ॥
म्हणती संपादा हा कार्यभाग । यथासांग देवांचा ॥ ३० ॥

---

१ डहाणूचे मामलेदार बाळासाहेब देव. २ सखाराम हरि जोग.

शुद्धभावाचें आमंत्रण । बाबांनीं ऐकूनि घेतलें संपूर्ण ॥
म्हणती जया माझें स्मरण । निरंतर आठवण मज त्याची ॥ ३१ ॥
मज न लागे गाडीघोडी । विमान अथवा आगिनगाडी ॥
हांक मारी जो मज आवडी । प्रगटे मी ते घडी अविलंबे ॥ ३२ ॥
तूं मी आणि तिसरा एक । तिघे मिळून जाऊं देख ॥
पाठवूनि दे ऐसा लेख । पावेल हरिख लिहिणारा ॥ ३३ ॥
असो बाबा जें जें बोलले । तें तें जोगांनीं देवां कळविलें ॥
देव मनीं आनंदित जाहले । अमोघ बोलें बाबांच्या ॥ ३४ ॥
देवांचाही पूर्ण विश्वास । बाबा आतां येतील खास ॥
परी हें जेव्हां अनुभवास । येईल तो दिवस सोनियाचा ॥ ३५ ॥
परी देवांस हेंही ठावें । शिरडीखेरीज तीनच गांवें ॥
तेथेंही क्वचितचि बाबांनीं जावें । शिरडींत असावें निरंतर ॥३६॥
मना आलिया सटीसामासीं । कधीं बाबा जात राहत्यासी ॥
कधीं रुई वा निमगांवासी । वस्तीसीं शिरडीसी अखंड ॥ ३७ ॥
या तीन गांवा पलीकडे । जात न केव्हांही कोणीकडे ॥
ते मग इतके लांब इकडे । डहाणूस मजकडे यावे कसे ॥ ३८ ॥
परी ते पूर्ण लीलावतारी । इच्छामात्रें स्वच्छंदचारी ॥
येणें जाणें हें लोकाचारीं । सबाह्याभ्यंतरीं परिपूर्ण ॥ ३९ ॥
तेथुनि येथें होईल येणें । अथवा येथून तेथें जाणें ॥
ही दोनीही आकाश नेणें । परिपूर्ण पूर्णपणें सबाह्य ॥ ४० ॥

---

१ हीं तीनही गांवें (राहतें, रुई व निमगांव) शिर्डीपासून २। मैलांचे आंत आहेत.

तैसीच बाबांची दुर्गमगती । स्थिरचरीं ते भरले असती ॥
तयां कैची आगती[1] निर्गती[2] । प्रकट होती स्वच्छंदें ॥ ४१ ॥
असो या आधीं एक संन्यासी । एका मासाचिया अजमासीं ॥
आला स्टेशन मास्तरापाशीं । डहाणू स्टेशनासी निजकार्या ॥ ४२ ॥
तो गोशाळा प्रचारक । गोसंस्थेचा स्वयंसेवक ॥
आला वर्गणी मागावया देख । स्थिति सांपत्तिक सुधरावया ॥ ४३ ॥
वेष पाहतां दिसे बंगाली । मास्तरानें युक्ति कथिली ॥
गांवांत जा तेथेंही अपुली । व्यवस्था चांगली लागेल ॥ ४४ ॥
तेथें आहेत मामलेदार । तयांपुढें मांडा हा विचार ॥
मिळतील शेटसावकार । लावितील हातभार तुम्हांस ॥ ४५ ॥
एक मामलेदार वळतां । पट्टी होईल हां हां म्हणतां ॥
या धर्माचिया कार्याकरितां । स्वस्थ चित्ता जा तेथें ॥ ४६ ॥
हें जों आंत मास्तर बोले । बाहेर घोडयाचे टाप वाजले ॥
स्वयें मामलेदारचि तेथें आले । उतरले गेले स्टेशनांत ॥ ४७ ॥
मास्तरातें भेटावयातें । खोलींत जेव्हां प्रवेशले ते ॥
मास्तर संन्यासिया झाले वदते । आले कीं येथेंच मामलेदार ॥४८॥
द्या आतां बोला काय तें । दैवें हे भेटले तुम्हां आयते ॥
संन्यासी निज मनोगतातें । जाहले निवेदिते त्यांपाशीं ॥ ४९ ॥
मग ते दोघे बाहेर आले । तेथेंच एका पेटीवर बैसले ॥
देवांस संन्यासी विनविते झाले । कार्य हें संपादिलें पाहिजे ॥ ५० ॥
गोरक्षणाचें धर्मकार्य । आपण हातीं धरिल्याशिवाय ॥
मज परकिया हातून हें काय । होईल का तिळप्राय तरी ॥ ५१ ॥

---

१ येणें. २ जाणें.

आपण तालुक्याचे अधिकारी । मी तो हा ऐसा भिकारी ॥
फिरें लोकांचिया दारोदारीं । टाळाया उपासमारी गाईंची ॥ ५२ ॥
टाकाल जरी एक शब्द । होईल माझें कार्य जलद ॥
मिळवाल गोमातांचे आशिर्वाद । यश निर्विवाद लाधाल ॥ ५३ ॥
परिसून संन्यासियाची विनंती । देव काय प्रत्युत्तर करिती ॥
गांवांत दुजिया कार्या संमती । वर्गणी हातीं घेतलीसे ॥ ५४ ॥
रावसाहेब नरोत्तम शेटी । जयां दीनांची दया पोटीं ॥
नगरशेट जे मोठे खटपटी । ते एक पट्टी उगरावती ॥ ५५ ॥
त्यांतचि तुमचिया पट्टीस जागा । होईल कैसी तरी सांगा ॥
समय हा नाहीं तुमचिया उपेगा । असो मग मागाहून पाहूं ॥ ५६ ॥
तरी आपण दो चार मासीं । थांबून या कीं या गांवासी ॥
पुढें मग पाहूं त्या समयासी । आज न यासीं अनुकूलता ॥ ५७ ॥
असो मग तो तेथूनि गेला । झाला असेल महिना याला ॥
तों तो टांग्यांत बैसून आला । पुनश्च डहाणूला माघारा ॥ ५८ ॥
देवांचिया दारांसमोर । वकील परांजपे यांचें घर ॥
तेथेंच टांगा थांबल्यानंतर । संन्यासी उतरतां देखिला ॥ ५९ ॥
तोचि कीं हा पूर्वील निश्चित । आला कीं आधींच वर्गणीनिमित्त ॥
ऐसें देव मुलातें वदत । अंतरीं शंकीत होऊनी ॥ ६० ॥
नाहीं पुरा महिना झाला । तोंच हा येथें किमर्थ आला ॥
विसरला का पूर्वील बोला । साशंकतेला हें मूळ ॥ ६१ ॥
तेणें तेथेंच टांगा सोडिला । तेथेंच कांहीं काळ क्रमिला ॥
आला मग देवांचिया घराला । काय मग लागला वदावया ॥ ६२ ॥
दहा वाजावयाचा वेळ । ब्राह्मणभोजनारंभ काळ ॥
पाहूनि देवांचीं घालमेल । वदे न मज उतावेळ पैशाची ॥ ६३ ॥

" आया हूं न पैसेके लिये। आज तो हमकू भोजन चाहिये' ॥
देव म्हणाले " आवो आनंद है। घर ए समझिये आपका ॥६४॥
तव संन्यासी वदे इतुक्यांत। "हमारे दोन बच्चे है साथ ॥"
" वहोत अच्छी है ए बात "। देव मग म्हणतात तयातें ॥ ६५ ॥
होता जेवावया अवकाश। म्हणोनि देव पुसती तयांस ॥
" कहां आपका उतारा है खास। जहां मै तपासकूं भेजूं " ॥ ६६ ॥
"क्या जरूर कब मै आवूं। किस घंटे मै हाजर रहूं ॥
जब बोलोंगे तब आतां हूं।" संन्यासी बोलूं लागला ॥ ६७ ॥
"अच्छा बच्ये लेके साथ। बारा घंटे होनेके वखत ॥
आवो भोजन पावा संत"। ऐसें तव वदत देव तया ॥ ६८ ॥
असो मग ते संन्यासी गेले। बरोबर बारा होतां परतले ॥
जेवावया तिघेही बैसले। भोजनीं घाल येथेष्ट ॥ ६९ ॥
होऊनियां पाकनिष्पत्ती ब्राह्मणांच्या बैसल्या पंक्ती ॥
सपरिवार संन्यासिया प्रती। तृप्त करिती यजमान ॥ ७० ॥
सर्वें घेऊनि दोघेजण। आला संन्यासी आपण होऊन ॥
तरी तयाचें पूर्व प्रयोजन। पसरी आवरण मायेचें ॥ ७१ ॥
तेणें हा कोणीतरी अतीथी। सावावया भोजन प्राप्ती ॥
आला इतुकेंच देवांचे चित्तीं। दृढावली वृत्ती मोहाची ॥ ७२ ॥
एणेंपरी झालीं भोजनें। उत्तरापोशनें शुद्धाचमनें ॥
सुगंधशीतल उदकप्राशनें। मुखशुद्धिदानें संपादिलीं ॥ ७३ ॥
शिष्टाचार गंधसुमनें। तांबूल अत्तर गुलाबदाने ॥
दिधलीं सर्वत्रांप्रति बहुमानें। आनंदानें देवांनीं ॥ ७४ ॥
असो मग ऐसिया उपरीं। मंडळी गेली घरोघरीं ॥
संन्यासीही निजपरिवारीं। गेले माघारी निजस्थळीं ॥ ७५ ॥

जरी आगंतुक अनिमंत्रित । तरी ते वेळीं येऊनि जेवत ॥
परी देवां न बाबासे वाटत । संशय राहत मनांत ॥ ७६ ॥
ऐसें जरी घडलें प्रत्यक्ष । तिघे अयाचित वाढिले समक्ष ॥
तरीही देव मनीं साकांक्ष । जोगांचि साक्ष घेतातची ॥ ७७ ॥
असो होतां उद्यापन पूर्ती । देव तंव जोगां पत्र लिहिती ॥
ऐसें कैसे हो बाबा फसविती । काय ते वचनोक्ति वदावी ॥ ७८ ॥
आपणही सवें याल । अन्यथान होईल बोल ॥
कांहीं तरी साक्ष पटेल । कैसें न वाटेल हें मजला ॥ ७९ ॥
तरी ही ऐसी गत कां झाली । माझीच कांहीं निराशा केली ॥
बहुसाक्षेपें वाट पाहिली । कांहीं न आली प्रचीती ॥ ८० ॥
प्रेमें बाबांस निमंत्रितां । येतों वदले मज चरणागता ॥
परी तें सर्व झालें अन्यथा । कैसें हें सर्वथा न कळे मज ॥ ८१ ॥
माझी येण्याची परतंत्रता । अति काकुळती पत्रीं लिहितां ॥
तरीही आपण येणार हें परिसतां । मज बहु धन्यता वाटली ॥ ८२ ॥
आतां आपण कवण्याही मिषें । येणार वाटलें कवण्याही वेषें ॥
परी तें कांहीं न घडलें कैसें । आश्चर्य विशेषें वाटतें ॥ ८३ ॥
जोगांनीं तें सकळ वृत्त । साईचरणीं केलें निवेदित ॥
बाबा होऊनि आश्चर्य चकित । काय तयांप्रत बोलत ॥ ८४ ॥
पत्र उकलतां मज पुढतीं । पत्रांतर्गत मनोवृत्ती ॥
वाचावयाचे आधींच निश्चिती । उभ्याच ठाकती मूर्तिमंत ॥ ८५ ॥
तों वदे मी माझिया बोलें । विश्वास देऊनि तया फसविलें ॥
सांग तया त्वां मज नोळखिलें । कां मग बोलविलें होतेंस ॥ ८६ ॥
लौकीकीं ना येथून हाललों । परी मी उद्यापनीं जेऊनि आलों ॥
दोघां समवेत येईन बोललों । तैसाच गेलों दोघांसवें ॥ ८७ ॥

होता जेवावया अवकाश । तेव्हांच आधीं एकटा सावकाश ॥
तुज नाठवे का संन्यास वेष । प्रथम प्रवेश येरीती ॥ ८८ ॥
पाहूनि आलों अकल्पित वृत्ती । पैसे मागें न तुज ही भीती ॥
वाटली नव्हती का तव चित्तीं । संशय निवृत्ती म्यां केली ॥ ८९ ॥
येईन केवळ जेवावयास । सवें घेऊनियां दोघांस ॥
ऐसें सांगूनियां वेळेस । नाहीं का दोघांसह जेवलों ॥ ९० ॥
पहा मी माझिया वचनाकारणें । मरोनि जाईन जीवें प्राणें ॥
परी माझिया मुखींचीं वचनें । अन्यथा होणें नाहीं कदा ॥ ९१ ॥
ऐसें वदतां साइनाथा । आनंद नावरे जोगांच्या चित्ता ॥
दिधलें वचन व्हावें न अन्यथा । अनुभव हा सर्वथा सर्वांचा ॥९२॥
पुढें मग हें सर्व वृत्त । जोग कळविती देवांप्रत ॥
पत्र एक सविस्तर धाडित । अति मुदित मानसें ॥ ९३ ॥
देवांनीं जैं पत्र वाचिलें । प्रेमोद्रेकें नेत्र ओथंबले ॥
धिक् धिक् व्यर्थ साईस दूषिलें । बहु हिरमुसले मनांत ॥ ९४ ॥
धन्य बाबांचें महिमान । धिक् माझ्या जाणिवेचा अभिमान ॥
परी बाबाच संन्यासी हें अनुमान । व्हावें तें कैसें न मज कळे ॥९५॥
कारण बाबांस केलें निमंत्रण । त्या आधींच त्या प्रथमाभिगमन ॥
तेंही तयाच्या कार्या लागून । भेटीस प्रयोजन पट्टीचें ॥ ९६ ॥
तया दिधली होती मुदत । दो चार मासा यावें परत ॥
तोच तो जरी भोजन मागत । होईल का अनुमित बाबाच ते ॥९७॥
मात्र एकचि बाबांचें वचन । येईन जेव्हां कराया भोजन ॥
माझियासंगें येतील दोन । विसरलों मी भान तयाचें ॥ ९८ ॥

बाबांचिया आमंत्रणापाठी । पडती जरी यासी प्रथम गाठी ॥
तीही केवळ जेवणासाठीं । तरी न हे दिठी चाकाटती ॥ ९९ ॥

परी तो आला गोरक्षण निमित्त । मिळवावया गोग्रासवित्त ॥
तयानंतर तें साइभत । आमंत्रण जात उद्यापना ॥ १०० ॥

म्हणोन ऐसा मोह पडला । तेणें हा ऐसा प्रकार घडला ॥
जरी दोघांसह येऊन जेवला । तरीं तो भासला अन्नार्थी ॥ १०१ ॥
नसतां कोणी पूर्वपरिचित । भोजनसमयीं येतां अकल्पित ॥
घेऊनि कोणीही दोघे समवेत । साईच ते निश्चित वाटते ॥ १०२ ॥
परी या संतांची ऐसीच रीती । अघटित लीला अद्भुतकृती ॥
भक्तांघरींची कार्यस्थिती । स्वयेंचि योजिती त्याआर्थीं ॥ १०३ ॥

भक्त विनटतां निजचरणीं । तयाचिया शुभकार्याची संपादणीं ॥
ऐसीच होते अकल्पितपणीं । अतर्क्य करणी संतांची ॥ १०४ ॥
चिंतिलेंचि दे चिंतामणी । कल्पवृक्ष दे कल्पिलें मनीं ॥
कामधेनू ते कामप्रसविणी । अचिंत्यदानी गुरुमाय ॥ १०५ ॥
असो ये ठायीं बाबा निमंत्रित । संन्यासियाच्या रूपें प्रगटत ॥
परी तयांची लीला अघटित । अयाचितही येत कधीं ॥ १०६ ॥

कधीं छायाचित्ररूपें । कधीं पार्थिव मूर्तिस्वरूपें ॥
पार नाहीं तयाच्या कृपें । प्रगटती आपेआप कधीं ॥ १०७ ॥

ये अर्थांचा माझा अनुभव । परिसतां श्रोतयां वाटेल नवलाव ॥
कळेल साइलीला प्रभाव । कथाही अभिनव अपूर्व ॥ १०८ ॥

ही का कथा कीं ही काहणी । ऐसेंही ईस वदेल कोणी ॥
म्हणावें तें खुशाल त्यांणीं । परीये श्रवणीं सादर व्हा ॥ १०९ ॥

---

१ दृष्टि. २ चकली नसती.

आळस निद्रा तंद्रा टाकून । होऊनियां सावधान ॥
कथाही परिसा द्या हें दान । होईल समाधान मन माझें ॥ ११० ॥
व्यग्रता क्षण झुगारून । स्वस्थचित्त अव्यग्रमन ॥
झालिया कामा येईल श्रवण । पुढें मग मनन निजध्यास ॥ १११ ॥
तेथून पुढें साक्षात्कार । परी या सर्वां श्रवण आधार ॥
तेंच कीं या सर्वांचें सार । निश्चयें भवपार त्याचेनी ॥ ११२ ॥
सन एकोणीसशें सतरा इसवीसीं । फाल्गून शुद्ध पौर्णिमेसी ॥
शेजे निद्रिस्त असतां पहाटेसी । स्वप्न एक मजसीं जाहलें ॥ ११३ ॥
पहा साईचें विचेष्टित । सुंदरवेष संन्यासी होत ॥
देऊनि दर्शन मज जागवीत । भोजना मी येत आज वदे ॥ ११४ ॥
स्वप्नामाजील जागृतपण । तेंही केवळ स्वप्नचि पूर्ण ॥
कारण जागृत होतां मी आपण । कराया आठवण लागलों ॥ ११५ ॥
डोळे उघडूनि पाहूं लागें । नाहीं साई न कोणी ते जागे ॥
स्वप्नचितें जें क्षणा मागें । यत्किंचित जागेंपण नव्हतें ॥ ११६ ॥
ऐसी होतां मनाची निश्चिती । आठवूं लागलों स्वप्नस्थिति ॥
अक्षरें अक्षर आठवलें चित्तीं । लवमात्र विस्मृती विरहीत ॥ ११७ ॥
येतों मी आज भोजनास । या साईच्या स्पष्टोक्तीस ॥
ऐकूनि आनंदलों जीवास । कळविलें कलत्रास हें वृत्त ॥ ११८ ॥
ध्यानीं मनीं साईचा ध्यास । हा तो निरंतरचा अभ्यास ॥
सात वर्षांचा जरी सहवास । आस न भास भोजनाचा ॥ ११९ ॥
असो तिजला ठेविलें सांगून । आहे आज होळीचा सण ॥
एक टिपरी अधिक आधण । घालाया आठवण ठेवावी ॥ १२० ॥
हें इतुकेंचि कळवितां तीस । लागली कारण पुसावयास ॥
मी म्हणे आज जेवावयास । पाहुणा या सणास येणार ॥ १२१ ॥

तव ती म्हणे सांगा कोण । जिज्ञासा तीस जाहली दारुण ॥
परी मी सांगतां खरें कारण । उपहासाभाजन होणार ॥ १२२ ॥
हेंही मज ठावें पूर्ण । तरीही न व्हावें सत्य प्रतारण ॥
म्हणोनि श्रद्धापूर्वक जाण । केलें मी निवेदन सत्यत्वें ॥ १२३ ॥
तरी हें आहे श्रद्धेवरी । जैसी जया जाणीव अंतरीं ॥
वार्ता खोटी अथवा खरी । हें तों मनावरी सर्वथैव ॥ १२४ ॥
कितीही तिची करितां खातरी । वार्ता पटेना तियेचे अंतरीं ॥
ती म्हणे बाबा शिरडीहूनि दुरी । कशासही तरी येतील ॥ १२५ ॥
आपुले येथील काय भोजन । कशाचा अपुला होळीचा सण ॥
टाकूनियां शिरडीचें मिष्टान्न । सेवितील कदन्न का येथें ॥ १२६ ॥
येणें परी तिचें भाषण । मी म्हणे एक टिपरीचें आधण ॥
ठेवितां आपणा सायास कोण । टिपरीची वाण नाहीं तुज ॥ १२७ ॥
प्रत्यक्ष येतील साईच पाहुणे । ऐसें तुजला मीही न म्हणे ॥
परी घडेल कोणाचें तरी येणें । हें निःशंकपणें मज वाटे ॥ १२८ ॥
मग तूं मनीं कैसेंही मान । मी त्या मानीन साईसमान ॥
किंबहुना प्रत्यक्ष साई न आन । अन्वर्थ स्वप्न होईल मज ॥ १२९ ॥
असो ऐसें जाहलें भाषण । पुढें पातला समय माध्यान्ह ॥
होतां यथाविधि होलिका पूजन । मांडिली भोजनपत्रावली ॥ १३० ॥
आदीकरून पुत्रपौत्र । दुहिता जामात इष्टमित्र ।
पंक्ती मांडिल्या सपीठपात्र । घातल्या विचित्र रांगोळ्या ॥ १३१ ॥
त्यांतचि एका मुख्यपंक्ती । पाट मांडिला मध्यवर्ती ॥
पात्र एक साईप्रती । इतरां समवेती वाढलें ॥ १३२ ॥
पात्राभोंवती रांगोळी । घातली रंगीबेरंगी निळी ॥
प्रत्येका तांब्या पंचपात्रीपळी । सर्वांसमेळी समसगट ॥ १३३ ॥

पापड सांडगे कोशिंबिरी । वाढिलीं लोणचीं रायतीं साजिरीं ॥
परोपरीच्या भाज्या खिरी । जाहली तयारी बहुतेक ॥ १३४ ॥
पाहूनियां बारा झाले । जेवणारे सोंवळीं नेसले ॥
येऊनि एकेक पाटीं बैसलें । तोंही न आलें कोणी दुजें ॥ १३५ ॥
सर्व पात्रें गेलीं भरोन । वाढिलें भात पोळी वरान्न ॥
रित्या मध्यवर्ती पात्रावांचून । कांहीं न न्यून तें जागीं ॥ १३६ ॥
कोणी पाहुणा अथवा अतिथी । येईल म्हणून मार्ग लक्षिती ॥
जाहलों मी साशंक चित्तीं । वाट ती किती पहावी ॥ १३७ ॥
म्हणोनी दिधली दारास कडी । अन्नशुद्धि वाढिली तांतडी ॥
वैश्वदेव नैवेद्य परवडी । अन्नार्पण घडी पातली ॥ १३८ ॥
आतां घेणार प्राणाहुती । इतुक्यांत जिन्यावर पाउलें वाजती ॥
रावसाहेब कोठें कीं वदती । बैसले बैसती निवांत ॥ १३९ ॥
तंव मी तैसाच गेलों दारीं । वाटलें कोणी आलें अंतरीं ॥
हळूच दाराची कडी जों सारीं । दिसले जिन्यावरी दोघेजण ॥१४०॥
त्यांतील एक अल्ली महमद । दुजे संत मौलाना शिष्य[1] ।
इस्मू मुजावर नामाभिध । आनंदप्रद दोघेही ॥ १४१ ॥
पानें वाढूनि मंडळी बैसली । भोजनाची तयारी देखिली ॥
पाहोनि अल्लीनें विनंती केली । तसदी मी दिधली क्षमा करा ॥१४२ ॥
वाटतें आपण जेवणावरून । आलां मजकरितां धांवून ॥
आपणालागीं हात धरून । पंक्ती ही खोळंबून राहिली ॥ १४३ ॥
तरी घ्याही आपुली वस्त । मग मी भेटेन होतां फुरसत ॥
सांगेन नवलाव इत्थंभूत । अत्यद्भुत ये विषयींचा ॥ १४४ ॥
ऐसें वदून खाकेंतून । अल्ली एक पुडकें काढून ।
टेबलावर सन्मुख ठेऊन । सोडवूं गांठवण लागला ॥ १४५ ॥

१ शिष्य.

काढितां वृत्तपत्राचें वेष्टण। दिसली साईची मूर्ति तत्क्षण॥
म्हणे ही ठेवा वस्तू आपण। करा ही विनवण मान्य माझी॥१४६॥

पाहतां साईची तसवीर। रोमांच उठले शरीरावर॥
चरणावरी ठेविलें शीर। जाहलें अंतर सद्गदित॥ १४७॥

वाटला मोठा चमत्कार। ही साईची लीला विचित्र॥
वाटलें मज केलें पवित्र। दावूनि चरित्र हें ऐसें॥ १४८॥

उठली प्रबळ उत्कंठा मनी। आणिली ही तसवीर कोठुनी॥
तो म्हणे मी एका दुकानीं। विकत घेऊनी आणिलीसे॥ १४९॥

पुढें मग ते दोघेजण। उभे न राहती एकही क्षण॥
म्हणाले आतां जातों आपण। करावें भोजन स्वस्थपणें॥ १५०॥

आतांच या गोष्टीचें कारण। कथूं जातां केवळ निष्कारण॥
खोळंबेल मंडळीचें जेवण। तें मी मग कथीन सावकाश॥ १५१॥

मलाही तें वाटलें समर्पक। तसवीर वेळीं आली हा हरिख॥
तयांतचि मी जाहलों गर्क। आभारप्रदर्शक उद्गारलों॥ १५२॥

बरें आतां यावें आपण। आम्हीही पुढें करूं निवेदन॥
तसबीर येथें येण्याचें कारण। आजचि प्रयोजन काय तिचें॥१५३॥

असो पुढें ते गेलियापाठीं। यथानिश्चित साईसाठीं॥
मध्यवर्ती स्थापिल्या पीठीं। नेऊनि ती पाटीं प्रस्थापिली॥ १५४॥

सुखावलें अवघ्यांचें मन। अतर्क्य साईचें विंदान॥
एणेंमिषें करुनि आगमन। स्वप्नीचें वचन सत्य केलें॥ १५५॥

आलाच तर कोणी अतीथी। येऊनि तेथें बैसेल पंक्ती॥
हीच अपेक्षा ज्यांचिये चित्तीं। आश्चर्य किती हें तयां॥ १५६॥

पाहोनि चित्रींची सुंदर मूर्ती। परम आल्हाद सकळांमती॥
कैसें हें घडलें अकल्पित रीती। आश्चर्य करिती समस्त॥ १५७॥
ऐसें होतां प्रतिष्ठापन। केलें अघर्य पाद्यादि पूजन॥
भक्तिप्रेमें नैवेद्य समर्पण। अवघीं मग भोजन आरंभिलें॥ १५८॥
तैं पासाव हा काळवर। प्रत्येक होळीस ही तसबीर॥
करवूनि घेई हे शिष्टाचार। अष्टोपचार पूजेसह॥ १५९॥
इतर पूजेंतील देवांसहित। हीही देव्हारीं पूजिली जात॥
ऐसें हें साई अपूर्व चरित। भक्तांसि दावित पदोपदीं॥ १६०॥
असो पुढें हे दोघेजण। आज उद्यां भेटूं म्हणून॥
वर्षें नऊ गेलीं निघून। तरीही न दर्शन तयांचें॥ १६१॥
कर्मधर्मसंयोगें शेवट। अल्ली महमद याची गांठ॥
पडली यंदा जाहली भेट। सहज मी वाट चालतां॥ १६२॥
भेट होतांच जाहलों उत्सुक। तसबिरीचें पुसावया कौतुक॥
कां हो इतुकीं वर्षें मूक। वृत्तीचे सेवक बनलां तुम्ही॥ १६३॥
जैसी पूर्वीं तैसीच आज। पडली अवचित गांठी मज॥
योग आला आहे सहज। सांगा ती मौज समग्र॥ १६४॥
तुम्हीही श्रीसाईचे भक्त। आहे ठावें हें मज समस्त॥
परी ते दिवसींच कैसें अवचित। यावें हें उचित वाटलें ?॥ १६५॥
मग तो अल्ली वदे वृत्तांत। परिसा म्हणे कथितों साद्यंत॥
पहा साईची लीला अत्यद्भुत। आश्चर्यभरित ती सर्व॥ १६६॥
या लीलेचा काय अर्थ। काय यांतील निजकार्यार्थ॥
यांत भक्तांचें काय इंगित। साइच सुसंगत जाणता॥ १६७॥
आपण केवळ एकमेकांनीं। परिसाव्या या लीला कानीं॥
किंवा त्या गाव्या निजमुखांनीं। निःश्रेयस दानी म्हणवोनी॥१६८॥

असो आतां हा पुढील भाग । पुढील अध्यायीं कथू सांग ॥
आनंद पावेल श्रोतृसंघ । चरित्र अमोघ साईचें ॥ १६९ ॥
साई निर्द्वंष आनंदघन । सदा भजावा अनवछिन्न ।
पावाल निजसुख समाधान । मननिर्वासन होईल ॥ १७० ॥
चातक निजस्वार्था विनवी । मेघ सकळ सृष्टीतें निववी ।
बाळासाहब बाबांस बोलवी । बाबा तव पालवीत भक्तांसवें ॥ १७१ ॥
भक्तपंक्ती श्रोतेही बैसती । प्रेमें उद्यापन कथा परिसती ॥
साइसमागम आनंद भोगती । ढेंकरही देती तृप्तीचे ॥ १७२ ॥
अनाहूतही कैसे येती । कैसे पार्थिव स्वरूपें प्रगटती ॥
कैसे निज दासां आभारी करिती । कैसे ते जागविती पदोपदीं ॥ १७३ ॥
असो हेमाड साईसीं शरण । पुढील कथेची हीचि मांडण ॥
मांडील घेईल करूनि निरूपण । आपुली आपण यथेष्ट ॥ १७४ ॥
शरणागता घालितो पाठी । याच त्याचिया ब्रीदासाठीं ॥
हेमाड घाली पायीं मिठी । परता न लोटी ता तया ॥ १७५ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थसच्चरिते । उद्यापन कथा कथनं नाम ।
चत्वारिंशत्तमोध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

## सालमजकुरीं श्रीगुरुपौर्णिमेनिमित्त शिर्डी येथील कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

शनिवार ता. २४ जुलई आषाढ शु॥ १४ पुराण तिसरे प्रहरीं ४ वाजतां.
रविवार ता. २५ जुलई आषाढ शु॥ १५ रुद्राभिषेक, श्रींची पूजा व प्रसाद.
,, ,, दुपारीं ३ वाजतां संस्थान कमिटीची सभा.
,, ,, तिसरे प्रहरीं ५ वाजतां भक्त मंडळाची वार्षिक सभा.
,, ,, रात्रौ ९ वाजतां रथाची मिरवणूक.
सोमवार ता. २६ जुलई आषाढ वद्य १ भंडारा.
रात्रौ भजन व चावडींत पालखी नेणें व तेथें आरती.
मंगळवार ता. २७ जुलई आषाढ वद्य २ रात्रौ कीर्तन व पालखीची मिरवणूक.
बुधवार ता. २८ जुलई आषाढ वद्य ३ सकाळीं काला व दुपारीं तीर्थप्रसाद.


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचींही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील. वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे. एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

## श्री साईसच्चरित.

या श्री साईलीला मासिकांत प्रसिद्ध होत असलेला हेमाडपंतविरचित श्री साईसच्चरित नामक ओवीबद्ध ग्रंथ आतां संपत आला असून लवकरच तो पुस्तकरूपानें बांधून श्री साईलीला आफिसांत विक्रीस ठेवण्यांत येणार आहे. या सबंध ग्रंथाचीं पृष्ठें अजमासें ७०० वर होतील व यांत आरंभापासून अखेर पर्यंत प्रसिद्ध झालेले व होणारे सर्व फोटो व देखावे हेही प्रसिद्ध होतील. ग्रंथाची किंमत रु. ३ ठेविली जाईल.

४।५ महिन्यांत पुस्तकें बांधून तयार होतील. आज फक्त ग्राहक होऊं इच्छिणारांनीं खालील पत्त्यावर आपलीं नांवें व पत्ते नोंदवावेत. पुस्तकें बांधलीं जातांच व्ही. पी. नें रवाना केलीं जातील.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.
५ सेंट मार्टिन्स रोड ( मुंबई नजीक ) वांद्रें.

शिर्डी येथील

श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भीष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जाणारीं पद्यें व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनीं तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

**हरि सीताराम दीक्षित**

पुस्तक मिळण्याचें ठिकाण--श्री साईलीला ऑफीस.

**रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,**

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें.

**चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी**

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर

---

# श्री साईनाथ भजनमाला

## सुधारून वाढविलेली आवृत्ति

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी; कारण प्रती फार थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

**सावित्रीबाई तेंडुलकर.**

माला मिळण्याचा पत्ता:--**श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,**

रंगाऱ्याची चाल, वांद्रें. बी. बी. सी. आय्. रेल्वे.

---

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून
**रा. आ. तर्खड** यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.